॥ सा विद्या या विमुक्तये ॥

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Director, Board of Examinations & Evaluation**

**Phone: (02462) 229294**
**Fax : (02462) 229520**

**Website: www.srtmun.ac.in**

**E-mail : srtmuncoe@gmail.com**
**srtmundboee@gmail**.com


संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२०—२०२१/३२७ दिनांक: ०८.०९.२०२०

# तातडीचे परीपत्रक

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ,
संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड
संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, लातूर
संचालक, प्रस्तुत विद्यापीठ उपकेंद्र, परभणी
प्राचार्य, न्यु.मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली

**विषय: पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी—२०२० परीक्षा पध्दती बाबत.**

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळ व विद्यापरीषदेच्या निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील नियमीत व अंतीम सत्रातील ज्या विद्यार्थ्याचे मागील सत्राचे काही विषय अनुतीर्ण असतील तर या सर्व विषयांची उन्हाळी—२०२० परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यासाठी परीक्षा पध्दती निश्चित करण्यात आली ती खालील प्रमाणे आहे;

१) सध्या कोव्हीड—१९ या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता व विद्यार्थ्यांच्या आरोग्यास प्राधान्य देण्याकरीता प्रचलित परीक्षा पध्दती म्हणजेच लेखी परीक्षा न घेता नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन नवीन परीक्षा पध्दतीनुसार परीक्षा घेण्याचे ठरविण्यात आले आहे.

२) बहुपर्यायी (MCQ) ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीद्वारे परीक्षा घेण्यात येणार आहे. या नवीन परीक्षा पध्दतीची पुर्वतयारी, पेपर सेटींग करणे तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ देणे, महाविद्यालय स्तरावर नविन इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करणे या सर्व बाबीचा विचार करता प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम

वर्षाच्या अंतिम सत्राच्या विद्यार्थी परीक्षा व अंतिम सत्रातील ज्या विद्यार्थ्यांचे मागील सत्राचे कांही विषय अनुत्तीर्ण असतील तर त्या विषयांची **परीक्षा दिनांक ०३ ऑक्टोबर २०२० ते २५ ऑक्टोबर २०२०** दरम्यान घेण्यात येणार आहेत. या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षाचे वेळापत्रक टप्याटप्याने विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे.

३) वरील परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्र आजपर्यंत भरलेले नसल्यास त्यांना आवेदनपत्र **दिनांक १० सप्टेंबर २०२०** पर्यंत महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याची मुदत देण्यात येत आहे व महाविद्यालयाने सदर आवेदनपत्र विद्यापीठामध्ये **दिनांक १२ सप्टेंबर २०२०** पर्यंत सादर करावेत. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये परीक्षा आवेदनपत्र स्विकारू नये.

४) वरील परीक्षा संदर्भाने ज्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा अद्यापपर्यंत झालेल्या नाहीत, त्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा **दिनाक १५ सप्टेंबर २०२० ते २५ सप्टेंबर २०२०** या कालावधीत घेण्यात याव्यात व त्यांचे गुण तातडीने विद्यापीठात सादर करावेत. या प्रात्यक्षिक परीक्षेची कार्यपध्दती परीक्षा विभागाने निर्गमित केलेल्या दिनांक १९/०५/२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार असेल.

५) वरील परीक्षा या रविवार व सार्वजनिक सुट्टयाच्या दिवशीपण घेण्यात येणार आहेत.

## अ) परीक्षा पध्दती:

१) वरील सर्व परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (MCQ) पध्दतीने घेण्यात येतील. यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन Proctored Method ने व अपवादात्मक परिस्थितीमध्ये ऑफलाईन पध्दतीने OMR उत्तरपुस्तिकेव्दारे परीक्षा केंद्रावर परीक्षा घेण्यात येतील .

२) या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांना घरी बसून देता येईल. यासाठी सर्व महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे प्रबोधन करावे.

३) ही परीक्षा पध्दती प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संलगनीत महाविद्यालयातील पदवी, पद्व्युत्तर व पदवीका अभ्यासक्रम तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुले व दूरशिक्षणाव्दारे अभ्यासक्रमासाठी लागू असेल.

४) ऑनलाईन परीक्षेदरम्यान काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबधीत विद्यार्थ्याला वाढवून देण्यात येईल. ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांना एक तासाचा कालावधी असेल. ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने परीक्षा एकाच वेळेस सुरू होतील याची नोंद घ्यावी.

५) ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाईन पध्दतीने ओएमआर (OMR) उत्तरपुस्तिकेवर महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. अशा परिस्थितीत एखादया विद्यार्थ्याने गावाजवळच्या परीक्षा केंद्राची मागणी केल्यास त्यांनी मागणी केलेले परीक्षा केंद्र देण्यात येईल. हे विद्यार्थ्यांनी संमती

पत्रात नमुद करणे आवश्यक परंतु मागणी करण्यात आलेले परीक्षा केंद्र हे प्रस्तुत विद्यापीठ परीक्षेत्रातील असावे

६) सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी/संकुल प्रमुखांनी त्यांच्या महाविद्यालयातील /संकुलातील परीक्षार्थीकडून ऑनलाईन/ऑफलाईन परीक्षा देणे बाबत संमतीपत्र दिनांक १५/९/२०२० पर्यंत महाविद्यालयाने/संकुलाने विद्यार्थ्याकडून ई—मेलव्दारे किंवा प्रत्यक्षात महाविद्यालय/संकुलात बोलावून भरुन घ्यावेत व सर्व भरलेली संमती पत्रे विद्यापीठात दिनांक २०/०९/२०२० पर्यंत सादर करावेत. जे विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणेसाठी समतीपत्र देणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन परीक्षा पध्दतीने परीक्षा दयावी लागेल. विद्यार्थ्यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक व ईमेल संमती पत्रामध्ये अचूक नमूद करणे आवश्यक आहे.

७) ऑनलाईन परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थ्यांनी स्मार्टफोन, लॅपटॉप, संगणक, इंटरनेट कनेक्टीवीटीची सोय करण्याची जबाबदारी ही विद्यार्थ्याची राहील. हे संमतीपत्रामध्ये नमुद करावे. तसेच सर्व संलग्नीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्याना ऑनलाईन परीक्षा देता यावी यासाठी आवश्यक त्या सोयी सुविधा महाविद्यालयाने पुरावाव्यात किंवा महाविद्यालयामध्ये अशी व्यवस्था करावी.

८) ऑफलाईन परीक्षेसाठी सर्व प्रश्नपत्रिका या सर्व परीक्षा केंद्रावर ई—डिलीव्हरी मार्फत पाठविण्यात येतील.

१०) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या सोयीनुसार ऑनलाईन, ऑफलाईन किंवा ओपन बुक द्वारे परीक्षा घेण्याचे पर्याय देण्यात यावा व तसे संमती पत्र घ्यावे तसेच या विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे अतिरिक्त वेळ वाढवून देण्यात यावा.

११) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांना व महाविद्यालयातील शिक्षकांना Mock Test व इतर तांत्रिक माहिती **दिनांक २५ ते ३० सप्टेंबर २०२०** दरम्यान देण्यात येणार आहे.

## ब) परीक्षेचे व प्रश्नपत्रिकेचे स्वरुप

१) सदर पदवी व इतर अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी प्रश्नपत्रीका ही बहुपर्यायी (MCQ) पध्दतीची असेल त्यामध्ये ४० प्रश्न असतील त्यास व ४० गुणांचा असेल व प्रत्येक प्रश्नांसाठी १ गुण देण्यात येईल. सदर परीक्षेचा कालावधी हा १ तासाचा राहील. प्रत्येक प्रश्नांच्या उत्तरासाठी चार पर्याय असतील त्यापैकी विद्यार्थ्याने अचूक उत्तर निवडावे प्रत्येक प्रश्नासाठी ०१ गुण असेल व अभ्यासक्रम निहाय ४० गुणापैकी प्राप्त गुणांचे रुपांतर ७५/८० गुणांमध्ये करून गुणदान करण्यात येईल व निकाल देण्यात येईल

२) पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रश्नपत्रिका ही ४० गुणांची असेल व प्रश्नपत्रीके मध्ये ५० बहुपर्यायी (MCQ) प्रश्न असतील. सदर परीक्षेचा कालावधी हा १ तासाचा राहील. प्रत्येक प्रश्नांच्या उत्तरासाठी चार पर्याय असतील त्यापैकी विद्यार्थ्याने

अचूक उत्तर निवडावे. अभ्यासक्रम निहाय ४० गुणापैकी प्राप्त गुणांचे रुपांतर ७५/८० गुणांमध्ये करून अंतिम गुण देण्यात येतील व निकाल देण्यात येईल.

३) या सर्व परीक्षेसाठी गुणाचे प्रारुप प्रचलित पध्दतीनुसार (लेखी, प्रात्यक्षीक व अंतर्गत गुण, प्रकल्प इत्यादी) असेल.

४) या परीक्षेमध्ये निगेटिव्ह मार्कींग नसेल.

## क) महाविद्यालय व विद्यार्थी यांच्यासाठी इतर सूचना

- वरीलप्रमाणे उन्हाळी—२०२० परीक्षेच्या नियोजनासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांना आवश्यकतेनुसार महाविद्यालयात बोलवावे व त्यांना सदर परीक्षेचे कामे करणे बंधनकारक राहिल.
- विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होणेपूर्वी १५ मिनीटे अगोदर परीक्षा दालनात उपस्थित रहावे व परीक्षा संपल्यानंतर १५ मिनीटांमध्ये परीक्षा केंद्राच्या परीसरातून बाहेर पडावेत.
- ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांना पेपर सुरु झाल्यानंतर जास्तीत जास्त ३० मिनिटे उशिराने प्रवेश दिला जाईल तर परीक्षा सुरू झाल्यानंतर किमान ३० मिनिटानंतर परीक्षा कक्ष सोडण्यास परवानगी देण्यात यावी.
- सर्व संलग्नित महाविद्यालयानी वरीलप्रमाणे उन्हाळी—२०२० पदवी व पदव्युत्तर परीक्षेचे माहिती जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करावेत त्यासाठी परिपत्रकाद्वारे महाविद्यालय वेबसाईडवर व नोटीस बोर्डावर सूचना देण्यात याव्यात.
- जर एखादे महाविद्यालय कोव्हीड—१९ करीता अधिगृहीत केले असेल व त्यांच्याकडे इतर व्यवस्था नसेल तर त्या महाविद्यालयाने इतर कनिष्ठ महाविद्यालय अथवा शाळा मिळविण्याकरीता प्रयत्न करावेत यासाठी विद्यापीठही सहकार्य करेल. परंतु अशा परिस्थितीत महाविद्यालयाने दिनांक १५ सप्टेंबर २०२० पर्यंत परीक्षा विभागाकडे पत्रव्यवहार करावा व त्यात पर्यायी परीक्षा केंद्राचाही शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा उल्लेख करावा.
- बैठक व्यवस्था ही कोव्हीड—१९ ची नियमावली पाळून करावे. (४० बैठक व्यवस्था असलेल्या हॉलमध्ये केवळ २० विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करावी.) त्यानुसारच पर्यवेक्षकांची नियुक्ती करावी या बाबतची पूर्ण जबाबदारी महाविद्यालयाची राहिल.
- कोव्हीड—१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित डोळयासमोर ठेऊन परीक्षेपुर्वी सर्व परीक्षा केंद्रातील दालनाचे निर्जंतुकीकरण (Sanitization) करून घेण्यात यावे यासाठी परीक्षा केंद्राना निर्जंतुकीकरण (Sanitization) करणेसाठी रू. २,००० (रूपये दोन हजार) विद्यापीठातर्फे देण्यात येतील त्याबाबतचे देयके परीक्षा केंद्र देयकामध्ये नमूद करावी.
- ऑफलाईन परीक्षेसाठी सर्व परीक्षा केंद्रानी विद्यार्थ्यांसाठी Thermal Scanning Machine, Sanitizer चा वापर करावा तसेच विद्यार्थ्यानी तोंडाला मास्क बांधणे, परीक्षा केंद्रावर Social Distancing पाळणे बंधनकारक असेल. तसेच शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या कोविड—१९ विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनाचे पालन

करणे बंधनकारक राहील. शासनाने कोव्हीड—१९ करीता पारीत केलेल्या सर्व परीपत्रकाचे अनुपालन करावे.

सबब, उपरोक्त प्रमाणे उन्हाळी—२०२० सर्व पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेणे बाबतची कार्यपध्दती व सर्व सूचनांचे संबधीत महाविद्यालयाने/संकुल प्रमुखाने काटेकोरपणे पालन करून परीक्षा यशस्वीपणे पार पाडणेसाठी सहकार्य करावे.

**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीस्तव:**

१. मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्र—कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
४. मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
५. सर्व उपविभाग परीक्षा, प्रस्तुत विद्यापीठ.
६. सर्व अधिकारी/अधिक्षक/सहा. अधिक्षक, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ